**उलटतपास श्री. आर. ए. संघवी अधिवक्ता गैरअर्जदार क्रमांक ०१ व ०२ तर्फे :**

१३. मी दिनांक १६.११.१९९३ रोजी जिल्हा परिषद, चंद्रपूर येथे आरोग्य सेवक या पदावर लागलो. सुरुवातीला मी प्राथमीक आरोग्य केंद्र मांजरी, ता— भद्रावती, जि— चंद्रपूर येथे रुजू झालो. मी दिनांक ३०.०६.२०२४ रोजी सेवा निवृत्त झालो. मी माझा नियुक्ती आदेश अभीलेखावर दाखल केलेला नाही. माझे शेवटचे मूळ वेतन ६०,४००/— रुपये व महागाई भत्ता २७,७८४/— रुपये ऐवढा होता. मला माहीती नाही की जिल्हा परिषद कर्मचा—याला महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन अधिनियम १९८२ लागू होतो. मला माहीती नाही की निवृत्ती वेतन व उपदानाची रक्कम ही जिल्हा परिषद कर्मचा—याला महाराष्ट नागरी सेवा निवृत्ती वेतन अधिनियम १९८२ प्रमाणे मीळते. मला सध्या ३७,७४३/— रुपये दरमहा पेन्शन मीळते. मी जेव्हा निवृत्त झालो तेव्हा मला रुपये ९,४८,५५०/— ऐवढी उपदानाची रक्कम मीळालेली आहे.

१४. महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन अधिनियम १९८२ मधील कलम १११ प्रमाणे मला उपदानाची रक्कम मीळाली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. जिल्हा परिषद ही महाराष्ट्र शासनामध्ये येते किंवा कसे हे मला माहीती नाही. जिल्हा परिषद ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. जिल्हा परिषद महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन अधिनियम १९८२ प्रमाणे उपदानाची रक्कम कशी

काढली जाते हे मला माहीती नाही. उपदान अधिनियम १९७२ हा जिल्हा परिषद कर्मचा—याला लागू आहे त्याबाबत मी माझे अर्जात नमूद केलेले आहे. हे मला माहीती नाही की उपदान अधिनियम १९७२ हा कशाप्रकारे जिल्हा परिषदेला लागू आहे.

१५. मला माहीती नाही की जिल्हा परिषद शासनाचे नियमाप्रमाणे काम करते. मला उपदानाची रक्कम भेटल्यानंतर सदर रक्कम अपुरी आहे याबाबत मी हरकत अर्ज जिल्हा परिषदेकडे दिला नाही. हे म्हणने खरे नाही की मी जिल्हा परिषदेकडे उपदानाची मागणी न करता सरळ न्यायालयात केस दाखल केली. हे म्हणने खरे नाही की माझे मीत्राने मला सांगीतले की उपदानाची रक्कम मीळते म्हणून मी न्यायालयात केस दाखल केली.

१६. मी हजेरी पत्रकाची प्रत अभीलेखावर दाखल केली नाही. हे म्हणने खरे नाही की मी मगणी केलेली उपदानाचे फरकाची रक्कम ही बेकायदेशीर व नियमबाहय आहे. हे म्हणने खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले असून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण झाला.**

**फेरतपास काही नाही.**

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर.

दि. १३.०३.२०२६.